# -: महाराष्ट्र गट-क सेवा परीक्षा:-

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येतात:-

| अ. क्र. | पदाचे नांव | संवर्ग | वेतनबँण्ड व ग्रेड वेतन | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | **उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय** | गट-क अराजपत्रित | S-१३ : ३५४००-११२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उद्योग अधिकारी(तांत्रिक), गट-ब व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या उद्योग संचालनालयाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| २ | **दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क** | | S-१२ : ३२०००-१०१६०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार निरीक्षक, गट - ब व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| ३ | **तांत्रिक सहायक, विमा संचालनालय** | | S-१० : २९२००-९२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार कनिष्ठ तांत्रिक अधिकारी, गट-ब व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या विमा संचालनालयातील महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| ४ | **कर सहायक** | | S-८ : २५५००-८११०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्यकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित). | राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| ५ | **लिपिक-टंकलेखक** | | S-६ : १९९००-६३२०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक कक्ष अधिकारी तसेच संबंधित कार्यालयाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उपलब्ध संवर्ग/पदावर | फक्त मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयात. |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत पाचही संवर्गातील भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते यांपैकी एक किंवा एकापेक्षा जास्त संवर्गासाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.३** जाहिरातीस अनुसरून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे एखाद्या आणि अथवा सर्व संवर्गाकारीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित संवर्गाच्या पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**२.४** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे पाचही पदांकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.५** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.६ सर्व संवर्गाकरीता मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक १ सामाईक असेल व सदर पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येईल.**

**२.७ मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक २ मात्र संबंधित संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदा-या विचारात घेऊन स्वतंत्रपणे घेण्यात येईल.**

**२.८** संबंधित संवर्गाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.९** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.१०** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.११** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व माहिती अंतिम समजण्यात येईल व त्याच्या आधारेच पुढील भरती प्रक्रिया होईल.

**२.१२** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत नंतरच्या टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

**३. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**४.पात्रता:-**

**४.१** भारतीय नागरिकत्व

**४.२ वयोमर्यादा:-**

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास / मागासवर्गीय /आ.दु.घ. | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ.दु.घ. | अमागास | मागासवर्गीय/ /आ.दु.घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ.दु.घ. | |
| १ | उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय | जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी+३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+२ वर्षे | ४३ + सेवा कालावधी+२ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | तांत्रिक सहायक, विमा संचालनालय | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी+३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ४ | कर सहायक | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी+३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ५ | लिपिक-टंकलेखक | | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी+३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**४.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.४. अर्हता:-**

**४.४.१ शैक्षणिक अर्हता:-**

**४.४.१.१** उद्योग निरीक्षक, गट-क संवर्ग वगळता इतर संवर्गासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.४.१.२** उद्योग निरीक्षक, गट-क संवर्गाकरीता शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे राहील :-

(१) सांविधिक विदयापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा

(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.

**४.४.१.३** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**४.४.१.४** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**४.४.१.५** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**४.४.२ शारीरिक अर्हता :-**

**दुय्यम निरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ से.मी. जास्त. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ५० कि.ग्रॅ. |

**४.४.३ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी टंकलेखन अर्हता :-**

**४.४.३.१ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे टंकलेखन अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| कर सहायक | लिपिक-टंकलेखक | |
|---|---|---|
| | मराठी | इंग्रजी |
| मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण | मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. | इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**४.४.३.२** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**४.४.३.३** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची उपरोक्त टंकलेखन अर्हता मुख्य परीक्षेकरीता अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

**४.४.४ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट (कर सहायक व लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-**

(**१**)–दिव्यांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

(**२**)माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ अन्वये** त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

(**३**) अनाथ वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, **शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ अन्वये** त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**४.४.५** लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली, १९९१ अथवा त्यानंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार एतदर्थ मंडळाची विहित गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**५. शुल्क (फी):-**

**५.१** प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | शुल्क रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | अमागास | मागास | माजी सैनिक |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३९४ | २९४ | ४४ |
| २ | मुख्य परीक्षा (प्रत्येकी) | ५४४ | ३४४ | ४४ |

**५.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड),वि.मा.प्र.,इ.मा.व.,प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर)मोडणाऱ्या उमेदवारांनी, त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.३** क्रीमी लेअर संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**६. संयुक्त पूर्व परीक्षा:-**

**६.१ परीक्षा योजना:-**

**प्रश्नपत्रिका:-** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय व संकेतांक | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक ०१२) | १०० | १०० | बारावी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.२ अभ्यासक्रम:-**प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘ **उमेदवारांना सूचना** ’ अंतर्गत “ **अभ्यासक्रम** ” या सदराखाली उपलब्ध आहे.

**६.३ परीक्षा केंद्र:-**

**६.३.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक | केंद्र | संकेतांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ११ | गडचिरोली | २१ | नागपूर | ३२ | सोलापूर | ४२ |
| अकोला | १२ | गोंदिया | २२ | नांदेड | ३३ | ठाणे | ४३ |
| अलिबाग | १३ | हिंगोली | २३ | नंदुरबार | ३४ | वर्धा | ४४ |
| अमरावती | १४ | जळगाव | २४ | नाशिक | ३५ | वाशिम | ४५ |
| औरंगाबाद | १५ | जालना | २५ | उस्मानाबाद | ३६ | यवतमाळ | ४६ |
| बीड | १६ | कोल्हापूर | २६ | परभणी | ३७ | पालघर | ४७ |
| भंडारा | १७ | कुडाळ | २७ | पुणे | ३८ | नवी मुंबई | ४८ |
| बुलढाणा | १८ | लातूर | २८ | रत्नागिरी | ३९ | | |
| चंद्रपूर | १९ | मुंबई (मध्य) | ३० | सांगली | ४० | | |
| धुळे | २० | मुंबई (पश्चिम) | ३१ | सातारा | ४१ | | |

**६.३.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३.३** जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.३.४** विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली_तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**६.३.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.४ पूर्व परीक्षेचा निकाल:**

**६.४.१** भरावयाच्या प्रत्येक संवर्ग/पदाकरीता स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**६.४.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवारांकडून घेतलेल्या विकल्पाच्या आधारे तसेच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता (उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक, लिपिक-टंकलेखक) भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची स्वतंत्र सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**६.४.३** अराखीव(खुला) पदांकरीता निश्चित करण्यात आलेल्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. अराखीव(खुला) पदांकरीता निश्चित करण्यात आलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र ठरतील.

**६.४.४** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.४.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.४.७** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.४.८** जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे.

## ७. मुख्य परीक्षा:-

**७.१** प्रत्येक पदाकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

### ७.२ परीक्षेस प्रवेश:-

**७.२.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**७.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**७.२.३** संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक संवर्ग/पदाच्या परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

**७.२.४** प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता नसल्यास व शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता, मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

### ७.३. संवर्गाचा पसंतीक्रम (केवळ लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-

**७.३.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना लिपिक-टंकलेखक संवर्गापैकी ज्या संवर्गासाठी अर्ज केला आहे, तो संवर्ग (लिपिक-टंकलेखक मराठी अथवा इंग्रजी) नमूद करणे आवश्यक आहे. तसेच, दोन्ही संवर्गासाठी अर्ज करावयाचा असल्यास त्याप्रमाणे नमूद करणे आवश्यक आहे.

**७.३.२** पसंतीक्रम दर्शविलेल्या संवर्गाकरीता टंकलेखनाचे विहित मर्यादेचे अर्हता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित संवर्गाचा पसंतीक्रम रद्द करण्यात येईल.

**७.३.३** संवर्गाचा पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) पसंतीक्रम ऑनलाईन पध्दतीने मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच अर्जामध्ये दर्शविणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम दर्शविलेल्या संवर्गाकरीता टंकलेखनाचे विहित मर्यादेचे अर्हता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित संवर्गाचा पसंतीक्रम रद्द करण्यात येईल.

(३) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पसंतीक्रमामध्ये बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

### ७.४ परीक्षा योजना:

**७.४.१ मुख्य परीक्षेचे टप्पे-१ लेखी परीक्षा**

**७.४.२ लेखी परीक्षेचे एकूण गुण-२००**

**(१) संयुक्त पेपर क्रमांक-१ (१०० गुण)**

**(२)प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र पेपर क्रमांक-२ (प्रत्येकी १०० गुण)**

**७.४.३ प्रश्नपत्रिकांची संख्या:-दोन; पैकी पेपर क्रमांक १ पाचही संवर्गाकरीता संयुक्त, पेपर क्रमांक २ पाचही संवर्गाकरीता स्वतंत्र.**

**७.४.४ उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक, लिपिक-टंकलेखक मुख्य परीक्षा संयुक्त पेपर क्रमांक-१ व पेपर क्रमांक-२ करीता प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| पदनाम व परीक्षेचा संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पेपर क्रमांक — १ (संयुक्त पेपर)** | | | | | | | |
| सर्व पदांकरीता संकेतांक ००२ | मराठी | ६० | ६० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ४० | ४० | पदवी | इंग्रजी | | |

| पेपर क्रमांक — २ (स्वतंत्र पेपर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दुय्यम निरीक्षक** (संकेतांक ५०६) | सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे/ विषयासंबंधीचे ज्ञान | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **कर सहायक** (संकेतांक ५०७) | | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **लिपिक-टंकलेखक** (संकेतांक ५०८) | | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **उद्योग निरीक्षक** (संकेतांक ५०९) | | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **तांत्रिक सहायक** (संकेतांक ५१०) | | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**७.४.५ अभ्यासक्रम:**-सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सूचना ' अंतर्गत अभ्यासक्रम या सदराखाली उपलब्ध आहे.

**७.५ परीक्षा केंद्र :**

**७.५.१** मुख्य लेखी परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येतील:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (१)अमरावती | **१४** |
| (२)औरंगाबाद | **१५** |
| (३) मुंबई | **३०** |

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (४) नागपूर | **३२** |
| (५) नाशिक | **३५** |
| (६) पुणे | **३८** |

**७.५.२** उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेकरिता अर्ज/माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**७.५.३** परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**७.५.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**७.५.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली_तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**७.५.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७.५.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

## ८. लेखी परीक्षेचा निकाल:-

संयुक्त पेपर क्रमांक-१ तसेच प्रत्येक संवर्ग/पदाकरीता स्वतंत्रपणे घेण्यात येणा-या पेपर क्रमांक-२ चे गुण एकत्रित करुन प्रत्येक परीक्षेची निकाल प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात येईल.

## ९. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-

९.१ प्रत्येक संवर्गाच्या अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधरण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.२ सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे " भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) " हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

९.३ " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " पर्याय सादर करण्यासाठी उमेदवारांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

९.४ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

९.५ पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

## १०. टंकलेखन कौशल्य चाचणी (केवळ लिपिक-टंकलेखक व कर सहायक पदाकरीता):-

**१०.१ दिव्यांग आरक्षणाचा** दावा करणाऱ्या तसेच **माजी सैनिक आरक्षणाचा** दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अशा उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

**१०.२** लिपिक-टंकलेखक (मराठी), लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) तसेच कर सहायक या तीन संवर्गातील पदभरतीकरीता संगणक प्रणालीवर आधारित स्वतंत्र टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

**१०.३** टंकलेखन कौशल्य चाचणी ही केवळ अर्हताकारी/पात्रता (Qualifying) स्वरुपाची असेल.

**१०.४** लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या पदांच्या तीनपट उमेदवार टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता पात्र ठरविण्यात येतील.

**१०.५** लिपिक-टंकलेखक (मराठी), लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) व कर सहायक संवर्गाकरीता स्वतंत्रपणे टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येतील. कर सहायक संवर्गाकरीता मराठी व इंग्रजी या दोन्ही चाचणीमध्ये अर्हताकारी/पात्र (Qualifying) ठरणे आवश्यक असेल.

**१०.६ टंकलेखन कौशल्य चाचणीचा तपशील :-**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="3">तपशील</th><th>निकष</th></tr>
<tr><td>(१)</td><td colspan="3">चाचणीकरीता पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या</td><td>भरावयाच्या पदांच्या तीनपट</td></tr>
<tr><td rowspan="3">(२)</td><td colspan="2" rowspan="3">टंकलेखन कौशल्य चाचणीचे स्वरुप</td><td>लिपिक-टंकलेखक (मराठी)</td><td>अर्हताकारी (Qualifying)</td></tr>
<tr><td>लिपिक-टंकलेखक (इंग्रजी)</td><td>अर्हताकारी (Qualifying)</td></tr>
<tr><td>कर सहायक</td><td>दोन्ही भाषेत अर्हताकारी (Qualifying)</td></tr>
<tr><td rowspan="4">(३)</td><td colspan="4">चाचणीचे निकष</td></tr>
<tr><th>टंकलेखन</th><th>शब्द प्रतिमिनिट</th><th>KDPH<br>(Key Depressions Per Hour)</th><th>वेळ</th></tr>
<tr><td>इंग्रजी</td><td>४०</td><td>१२०००</td><td>१० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे)</td></tr>
<tr><td>मराठी</td><td>३०</td><td>९०००</td><td>१० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे)</td></tr>
<tr><td>(४)</td><td colspan="3">टंकलेखनाची गती मोजण्याची पध्दत</td><td>मजकुर संगणकावर विहित कालावधीत टंकलिखित करण्याच्या उमेदवाराच्या अचूकतेवर</td></tr>
<tr><td>(५)</td><td colspan="3">चुका/त्रुटी गणण्याचे प्रमाण</td><td>दोन दशांशपर्यंत</td></tr>
<tr><td>(६)</td><td colspan="3">त्रुटी/चुका मोजण्याची पध्दती</td><td>एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात</td></tr>
<tr><td rowspan="2">(७)</td><td colspan="2" rowspan="2">पात्रतेसाठी सीमांकन मर्यादा/रेषा</td><td>अराखीव</td><td>७%</td></tr>
<tr><td>मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अनाथ व दिव्यांग</td><td>१०%</td></tr>
<tr><td>(८)</td><td colspan="3">परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) ची उपलब्धता</td><td>अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार(लागू असल्यास)</td></tr>
</table>

**१०.७** लेखनिक/सहायकाची मागणी करणा-या अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) उपलब्ध करुन देण्यात येईल. (लागू असेल त्याप्रमाणे)

**१०.८** टंकलेखनातील त्रुटी/चुकांसंदर्भात एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात त्रुटी/चुका पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

**१०.९** टंकलेखन कौशल्य चाचणी करीता उपस्थित उमेदवारांना संगणक/किबोर्ड/इत्यादी हाताळताना सुलभता व्हावी, याकरीता उमेदवारांना प्रत्यक्ष चाचणी सुरु होण्यापूर्वी १० मिनिटांची सराव चाचणी देता येईल. त्यानंतर ३ मिनिटांचा विश्रांतीकाळ राहील व तदनंतर १० मिनिटांची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात येईल.

**१०.१०** टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता उमेदवारांना संबंधित भाषेतील परिच्छेद तसेच सदर परिच्छेदातील कळ अवनमन संख्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

**१०.११**लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी) व कर सहायक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार प्रस्तुत पदांकरीता टंकलेखन प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

**११. शिफारस:-**

**११.१**"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**११.२** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग व्यक्ती व अनाथ इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**११.३** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पात्र समजण्यात येईल.

**११.४** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला, पात्र खेळाडू, माजी सैनिक उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव खुला पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**११.५** दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**११.६** सर्व पदांकरीता लेखी परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे.

**११.७** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास - किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत

(३) दिव्यांग - किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत

(५) माजी सैनिक - किमान २० शतमत

(६) अनाथ - किमान ३० शतमत

**११.८** लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे (गुणवत्ता यादीनुसार) उपलब्ध पदांएवढ्या उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**११.९** शिफारसप्राप्त प्रत्येक उमेदवारास आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे व आयोगाकडील नोंदणीकृत क्रमांकावर लघुसंदेशद्वारे (एसएमएस) कळविण्यात येईल तसेच शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१२. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**१२.१** शिफारसपात्र उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी सक्षम प्राधिका-याकडून बोलविण्यात येईल.

**१२.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे सक्षम प्राधिका-याकडून तपासली जाईल.

**१२.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**१२.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**१२.५** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका-याकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच सक्षम प्राधिका-याने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेत घेण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१२.६** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

**१३. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

**१३.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) उमेदवार पात्र असलेल्या प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा.

**१३.२** वरील तपशील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिल्यानंतर याबाबतची माहिती उमेदवारांना संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१४.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक :- २२ जुलै , २०२२

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

*******************